**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.३ यांची जबानी**

मी याद्वारे शपथपूर्वक कथन करतो की,

माझे नाव – भाऊसाहेब पंढरीनाथ चौधरी

माझे वय ६० वर्षे व्यवसाय शेती

राहणार आंभोळ, ता.अकोले, जि.अहमदनगर.

**सरतपास अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी वकील श्रीमती के.आर.उतळे यांचेमार्फत–**

**१.** दिनांक १३.०९.२०१८ रोजी काय घटना घडली, हे मला माहित नाही. पोलिसांनी माझा जबाब नोंदविलेला नाही.

**(साक्षीदार अभियोग पक्षास सहाय्य करीत नसल्याने सहा. सरकारी वकील यांनी केलेल्या विनंतीनुसार त्यांना साक्षीदारास उलटतपासामध्ये विचारतात त्या स्वरुपाचे प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात आली.)**

**२.** हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १३.०९.२०१८ रोजी १६.०० वाजताचे सुमारास मी व रविंद्र चौधरी असे माझ्या शेतात गप्पा मारत असताना अजय सुदाम चौधरी व त्याचा मुलगा नैतिक हे त्यांच्या प्लॅटीना गाडी क्र.एम.एच.१७–बी.पी.२७५२ वरून कोतुळ ते आंभोळ या डांबरी रोडवरुन त्यांच्या घराकडे जात असताना त्यांच्या पाठीमागून एक मोटारसायकल भरधाव वेगात चुकीच्या दिशेने येवून अजय चौधरी यांच्या गाडीस जोराची धडक दिली. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी अजय चौधरी व त्यांचा मुलगा नैतिक हे गाडीसह खाली पडले. हे म्हणणे खरे नाही की, धडक दिलेल्या गाडीचा चालक पांडुरंग सिताराम लोहकरे व त्यांचे गाडीवर मागे बसलेले दोघेजण ते सुध्दा गाडीसह खाली पडले. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी रविंद्र सुदाम चौधरी व आम्ही सर्व बाकीचे लोक पळत आलो व अजय चौधरी यांना उठविले. हे म्हणणे खरे नाही की, अजय चौधरी यांच्या उजव्या खांद्याला जबर मार लागला. हे म्हणणे खरे नाही की, अजय यांच्या मोटारसायकलीला धडकलेली

प्लॅटीना गाडी क्र.एम.एच.१४–सी.ए.५५६८ वरील चालक पांडुरंग सिताराम लोहकरे यालाही किरकोळ मार लागला. हे म्हणणे खरे नाही की, त्या अपघातामध्ये दोन्ही गाड्यांचे नुकसान झाले आहे. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही अजय चौधरी यांना ग्रामीण रुग्णालय, कोतुळ येथे उपचाराकामी दाखल केले. हे म्हणणे खरे नाही की, डॉक्टरांनी प्रथमोपचार करून त्यांना पुढील औषधोपचाराकामी सिव्हील हॉस्पीटल, अहमदनगर येथे रेफर केले. हे म्हणणे खरे नाही की, अजय चौधरी यांनी त्यांच्या सोयीनुसार डॉक्टर सदाफुले हॉस्पीटल, अकोले येथे औषधोपचार घेतले. हे म्हणणे खरे नाही की, त्यांना पुढील औषधोपचाराकामी साईज्योत मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटल, कोपरखैरने, नवी मुंबई येथे दाखल केले. हे म्हणणे खरे नाही की, त्यांनी त्या हॉस्पीटलमधून डिस्चार्ज घेतल्यानंतर अपघाताच्या घटनेबाबत फिर्याद दाखल केली.

**३.**　आता मला जबाबातील पोर्शन मार्क 'अ' मधील मजकूर वाचून दाखविला. तो मजकूर मी पोलिसांना सांगितलेला नव्हता. पोलिसांनी तसा मजकूर का नमूद केला आहे, याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी हा माझ्या चांगल्या परिचयाचा आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला शिक्षा होऊ नये, म्हणून मी याकामी खोटी साक्ष देत आहे.

**<u>आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.टी.एस.फापाळे यांचेतर्फे उलटतपास–</u>**

**४.**　नाकारला.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत
सदरचा जबाब माझे समक्ष नोंदविणेत आला.

DHIRAJ MARUTI HINGLAJKAR　Digitally signed by DHIRAJ MARUTI HINGLAJKAR Date: 2026.03.10 15:09:04 +0530

**(डी.एम.हिंग्लजकर)**

**दिनांक – ०९.०३.२०२६**　　**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अकोले,**
**ता.अकोले, जि.अहमदनगर**